नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे | अंक - ८७ | वार - शुक्रवार दि. २१ ऑगस्ट २०२६ | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | पाने - ४ | किंमत - ४.०० रुपये | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026
Year - 4rd | Issue - 87 | Blow- Friday Date 21 AUGUST 2026 | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | Pages - 4 | Amout - 4 /- Rs | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## सुट्या खाद्यतेलाची विक्री बंद, 'एफडीए' चे १४ कलमी आदेश

### तळलेल्या तेलाच्या पुनर्वापरावरही बंदी; नियमांचे उल्लंघन केल्यास १० लाखांपर्यंत दंड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : नागरिकांच्या दैनंदिन आहारातील अत्यंत महत्त्वाचा घटक असलेल्या खाद्यतेलाबाबत अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) कठोर नियम लागू केले आहेत. खाद्यतेलाच्या पुरवठा साखळीत होणारी भेसळ, पुनर्वापर आणि असुरक्षित हाताळणी पूर्णपणे रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने १४ कलमी सर्वसमावेशक आदेश जारी केला आहे. या नव्या आदेशानुसार आता राज्यात सुट्या खाद्यतेलाच्या विक्रीवर कायमस्वरूपी बंदी घालण्यात आली असून, हा आदेश उत्पादकापासून ते किरकोळ विक्रेत्यापर्यंत संपूर्ण साखळीसाठी बंधनकारक असणार आहे. खाद्यतेलाच्या बाजारात होणाऱ्या विविध गैरप्रकारांमुळे सर्वसामान्यांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला आहे. विशेषतः अर्जेमोनसारख्या घातक पदार्थांची भेसळ, मुदत संपलेल्या तेलाचे पुनर्पेकिंग आणि तळण्यासाठी वापरलेल्या तेलाचा वारंवार होणारा पुनर्वापर यामुळे हृदयविकार, उच्च रक्तदाब, यकृत व मूत्रपिंडाची हानी आणि कर्करोगासारखे जीवघेणे आजार बळावत आहेत. ही गंभीर बाबी लक्षात घेता प्रशासनाने आता याप्रकरणी 'झिरो टॉलरन्स' धोरण अवलंबले आहे.

नव्या आदेशानुसार, आतापासून खाद्यतेलाची विक्री केवळ सीलबंद, पूर्ण लेबल असलेल्या वेष्टनातूनच करता येईल. सुटे किंवा वेष्टनरहित तेल विकणे हा गुन्हा मानला जाईल. उत्पादक आणि वितरकांनी सुटे तेल पुरवल्यास त्यांना मूळ उल्लंघनकर्ता मानून कठोर कारवाई केली जाईल. एकदा वापरलेला टिनचा डबा किंवा प्लास्टिकचे वेष्टन पुन्हा वापरण्यास सक्त मनाई आहे. गंजलेल्या किंवा डाग-वेल्डिंग केलेल्या डब्यांतून शिशासारखे घातक धातू तेलात मिसळण्याचा मोठा धोका असतो. वारंवार तापवलेल्या तेलातील 'एकूण ध्रुवीय संयुगे' (टीपीसी) प्रमाणाची मर्यादा २५ टक्क्यांपेक्षा अधिक असल्यास ते तेल वापरण्यास सक्त बंदी आहे. असे वापरलेले तेल हॉटेल किंवा खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी अधिकृत संकलकांकडेच सुपूर्द करावे; ते पुन्हा अन्नसाखळीत आणल्यास



दंडात्मक कारवाई केली जाईल. बहुस्रोत तेलामध्ये मोहरी तेल मिसळता येणार नाही. मोहरी तेल १०० टक्के शुद्ध स्वरूपातच विक्रीसाठी उपलब्ध असावे, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

अन्न सुरक्षा व मानके अधिनियमांतर्गत या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडाची तरतूद करण्यात आली आहे. असुरक्षित तेलाची विक्री केल्यास कलम ५९ नुसार कारावासाची शिक्षा आणि १० लाखांपर्यंत दंड होऊ शकतो. याशिवाय, अवमानक तेलासाठी ५ लाख, मिथ्याछाप तेलासाठी ३ लाख आणि परवान्याविना व्यवसाय केल्यास १० लाखांपर्यंत दंड आकारला जाईल. कंपनीच्या बाबतीत एकटे मालकच नव्हे, तर संबंधित संचालक आणि व्यवस्थापकही वैयक्तिकरीत्या यासाठी जबाबदार धरले जातील.

प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, त्यांनी कोणत्याही परिस्थितीत सुटे खाद्यतेल खरेदी करू नये. पाकिटावरील लेबल, बॅच क्रमांक आणि 'बेस्ट बिफोर' (उत्पादनापासून वापराची मुदत) तारीख तपासूनच सीलबंद तेल खरेदी करावे. जुन्या किंवा गंजलेल्या डब्यातील तेल टाळावे आणि खरेदीची पक्की पावती (बिल) आवर्जून मागावी. काही संशयास्पद प्रकार आढळल्यास नागरिकांनी अन्न व औषध प्रशासनाच्या संकेतस्थळावर किंवा अन्न सुरक्षा कनेक्ट पवर तत्काळ तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.


### महिनाभरात मराठी शिका, अन्यथा बॅज निलंबित

## व्यवहारिक मराठी न येणाऱ्या १,२६८ चालकांना नोटिस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रात व्यावसायिक प्रवासी वाहने चालविणाऱ्या चालकांना प्रवाशांशी सुसंवाद साधता यावा, यासाठी व्यवहारिक मराठी भाषेचे ज्ञान अनिवार्य करण्यात आले आहे. या नियमाच्या अंमलबजावणीसाठी आजपासून राज्यभर तपासणी मोहीम सुरू करण्यात आली आहे. ज्या चालकांना व्यवहारिक मराठीचे ज्ञान नसल्याचे तपासणीत आढळेल, त्यांना नोटीस बजावून एक महिन्याच्या कालावधीत मराठी भाषा शिकणे बंधनकारक करण्यात येत आहे. या मुदतीत मराठीचे ज्ञान आत्मसात न केल्यास संबंधित चालकाचा बॅज तीन महिन्यांसाठी निलंबित करण्यात येईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

मुंबई महानगर क्षेत्रात आज झालेल्या तपासणीत ३,९९५ वाहनचालकांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ६०४ चालकांना व्यवहारिक मराठीचे पुरेसे ज्ञान नसल्याचे आढळून आले असून, या सर्वांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. उर्वरित राज्यातील आकडेवारीनुसार आतापर्यंत ४,२२२ चालकांची तपासणी



करण्यात आली असून, त्यापैकी ६६४ चालकांना नोटिसा देण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्रात व्यवसाय करून प्रवाशांशी थेट संवाद साधणाऱ्या व्यावसायिक वाहनचालकांना व्यवहारिक मराठी येणे ही केवळ नियमांची बाब नाही, तर प्रवाशांच्या सोयी-सुरक्षेशी संबंधित बाब आहे. चालकांना मराठी शिकण्यासाठी पुरेसा कालावधी दिला जात आहे. मात्र, दिलेल्या मुदतीनंतरही नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले.

ही तपासणी मोहीम ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे. तपासणीदरम्यान चालकांना व्यवहारिक मराठीचे ज्ञान तपासले जाईल. मराठीचे ज्ञान नसलेल्या चालकांना सुधारणा करण्याची संधी देण्यात येणार असली, तरी त्यानंतरही नियमांचे पालन न करणाऱ्यांविरोधात विहित मुदतीनंतर बॅज निलंबनाची कारवाई करण्यात येणार आहे.

मराठी शिकण्यासाठी संधी आहे; नियम टाळण्यासाठी मुभा नाही, असा स्पष्ट संदेश परिवहन विभागाने या मोहिमेच्या माध्यमातून दिला आहे. असे प्रतिपादन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले.



## जंतर मंतर आंदोलनात पोलिसी बळाचा वापर, आरोपांची चौकशी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाकडून चौकशी समिती स्थापन; माजी न्यायमूर्तींची अध्यक्षपदी नियुक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : जंतर मंतर येथे कॉकरोच जनता पक्षाच्या आंदोलकांवर झालेल्या बळाच्या वापराच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने पाच सदस्यीय उच्चाधिकार समितीची स्थापना केली आहे. या समितीचे अध्यक्षपद सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती आर. सुभाष रेड्डी भूषवतील. इतर सदस्यांमध्ये पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती रवी शंकर झा, दिल्ली उच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीश न्यायमूर्ती शालिंदर कौर, सीबीआयचे माजी संचालक ऋषी कुमार शुक्ला आणि मेघालयाचे निवृत्त डीजीपी डॉ. एल. आर. बिश्नोई यांचा समावेश आहे. ही समिती पेलेट गन, इलेक्ट्रिक बॅटन, लाठीचार्ज आणि अश्रुधूर यांच्या अतिवापराची चौकशी करेल. तसेच महिला आंदोलकांवरील कथित हिंसाचार, पोलिसांची पाळत, जमाव नियंत्रण, जखमींवर उपचार आणि पीडितांना नुकसान भरपाई यासंबंधीच्या बाबींचीही तपासणी केली जाईल. ही समिती पोलीस, निमलष्करी दल आणि इतर सुरक्षा कर्मचाऱ्यांकडून आंदोलकांवर झालेल्या बळाच्या वापराच्या आरोपांची चौकशी करेल.

सीजेपीचा संसदेवरील मोर्चा बेकायदेशीर

दरम्यान, दिल्ली पोलिसांनी १८ ऑगस्ट रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाला सांगितले की, २० जुलै रोजीचा संसद मोर्चा बेकायदेशीर होता आणि त्यासाठी कोणतीही परवानगी न व्हती. जंतर मंतर येथील आंदोलनात अनेक सराईत गुन्हेगारांनीही सहभाग घेतला होता. पोलिसांनी सांगितले की, संसद मोर्चादरम्यान आंदोलकांनी बॅरिकेड्स तोडले आणि पोलिसांवर हल्ला करून शांततापूर्ण आंदोलनात अडथळा आणला. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी बळाचा वापर करण्यात आला, परंतु आंदोलकांवर कोणत्याही अतिरिक्त बळाचा वापर केला गेला नाही. पोलिसांच्या अत्याचारांची न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशी करण्याची मागणी करणाऱ्या याचिकांना उत्तर म्हणून दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात पोलीस उपआयुक्त सचिन शर्मा यांनी ही माहिती दिली.

पोलीस आणि आंदोलकांमध्ये संघर्ष

'कॉकरोच जनता पार्टी'चे (सीजेपी) जंतर मंतर येथील आंदोलन २० जून रोजी सुरू झाले. २० जुलैच्या 'संसद मोर्चा'दरम्यान पोलीस आणि आंदोलकांमध्ये संघर्ष झाला. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, आंदोलकांनी दगडफेक केली, तर सीजेपीने पोलिसांवर लाठीचार्ज आणि अश्रुधुराचा वापर केल्याचा आरोप केला. या पोलीस कारवाईत मोठ्या संख्येने आंदोलक आणि सुरक्षा कर्मचारी जखमी झाल्याचे वृत्त आहे.

### महाराष्ट्राच्या पशुवैभवाचा राष्ट्रीयस्तरावर दुहेरी सन्मान

### निश्चित झालेल्या प्रकल्पांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देणार

## 'उमरडा' गाईला स्वतंत्र देशी गोवंश, तर माडग्याळ मेंढी प्रजातीला राष्ट्रीय स्तरावर मान्यता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रातील प्रसिद्ध असलेल्या उमरडा या गाईला स्वतंत्र देशी गोवंश म्हणून, तर 'माडग्याळ' प्रजातीच्या मेंढीला राष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र व अधिकृत प्रजाती (ब्रीड) म्हणून मान्यता मिळाली आहे. यामुळे राज्यातील उमरडा या स्थानिक गोवंशाचे व माडग्याळ या मेंढी प्रजातीचे संवर्धन, जतन व आनुवंशिक सुधारणा कार्यक्रमांना मोठी चालना मिळणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाने राष्ट्रीय पशु आनुवंशिक संसाधन ब्यूरो, करनाल (हरियाणा) या संस्थेला पाठवलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने ही नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. 'भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या' (आयसीएआर) राष्ट्रीय पशु आनुवंशिक संसाधन ब्यूरो, करनाल (हरियाणा) चे संचालक डॉ. एन.एच. मोहन यांनी याबाबतचे अधिकृत पत्र जारी केले आहे. ७ ऑगस्ट २०२६ रोजी पार पडलेल्या 'आयसीएआर ब्रीड रजिस्ट्रेशन कमिटी'च्या १४ व्या बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन. यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रस्तावाचा पाठपुरावा आणि संशोधनात पुण्यातील 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र शेळी व मेंढी विकास महामंडळ', महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर तसेच कर्नाटक येथील कृषी व पशुवैद्यकीय विद्यापीठातील तज्ज्ञांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले असल्याचे मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन डॉ. शितलकुमार मुकणे यांनी सांगितले.

**पारंपरिक पशुधनाच्या संवर्धनाला संस्थात्मक आणि शास्त्रीय बळ - पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे**

महाराष्ट्राच्या मातीत विकसित झालेल्या उमरडा गाईला स्वतंत्र देशी गोवंश म्हणून आणि माडग्याळ मेंढीला स्वतंत्र अधिकृत प्रजाती म्हणून मिळालेली राष्ट्रीय मान्यता ही राज्यातील पशुपालकांसाठी अभिमानाची बाब आहे. या मान्यतेमुळे आपल्या पारंपरिक पशुधनाच्या संवर्धनाला संस्थात्मक आणि शास्त्रीय बळ मिळणार असून, भविष्यात पशुपालकांचे उत्पन्न वाढविण्यासाठीही त्याचा उपयोग होईल. राज्यातील स्थानिक गोवंश व मेंढी प्रजातींचे जतन करतानाच त्यांची उत्पादकता आणि आनुवंशिक गुणवत्ता सुधारण्यासाठी शासन आवश्यक त्या सर्व उपाययोजना करेल. महाराष्ट्राच्या पशुधनाची ही वैशिष्ट्यपूर्ण ओळख देशाच्या पशुधन क्षेत्रात अधिक ठळकपणे निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न राहील, असे पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.



उमरडा गोवंश आणि माडग्याळ मेंढीला राष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र अधिकृत ब्रीड म्हणून मिळालेली मान्यता ही महाराष्ट्राच्या पशुधन संपदेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची उपलब्धी आहे. या दोन्ही स्थानिक प्रजातींची वैशिष्ट्ये, आनुवंशिक क्षमता आणि स्थानिक परिस्थितीशी असलेली अनुकूलता यांचे शास्त्रीय पद्धतीने संवर्धन करण्यासाठी आता अधिक व्यापक संधी उपलब्ध झाल्या आहेत. पशुपालक, संशोधक, विद्यापीठे आणि संबंधित संस्थांच्या समन्वयातून या प्रजातींचे जतन, संवर्धन आणि आनुवंशिक सुधारणा यांना अधिक गती देण्यात येईल. महाराष्ट्राच्या स्थानिक पशुधनाला राष्ट्रीय ओळख मिळवून देण्यासाठी विभाग सातत्याने प्रयत्नशील राहील, असे पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन.यांनी सांगितले.

राष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र ओळख मिळाल्यामुळे आता उमरडा या गोवंशाच्या व माडग्याळ या मेंढी प्रजातीच्या जतन, संवर्धन व सुधारित प्रजननासाठी सरकारी स्तरावर विशेष योजना व निधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, ज्यामुळे स्थानिक पशुपालकांना मोठा फायदा होईल. महाराष्ट्र शासनाचा पशुसंवर्धन विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र शेळी व मेंढी विकास महामंडळ, पुणे व महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर तसेच संशोधन क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांच्या प्रदीर्घ अभ्यास व सातत्यपूर्ण पाठपुराव्याला या निर्णयामुळे मोठे यश मिळाले आहे. राष्ट्रीय स्तरावर अधिकृत नोंदणी मिळाल्यामुळे या प्रजातींच्या शास्त्रीय जतन, प्रजनन सुधारणा व गुणवत्ता वाढीसाठी केंद्र व राज्य शासनाच्या विशेष योजना राबवणे आता अधिक सोपे होणार आहे. यामुळे स्थानिक पातळीवर पशुपालकांचे उत्पन्न वाढण्यास व ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती मिळण्यास मोठी मदत होईल, असे पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी सांगितले

अमरावती जिल्ह्याचे ब्रिटिशकालीन गॅझेटमधील (१९१०) नोंदीवरून उमरडा गोवंश गेल्या शतकापासून आपले अस्तित्व राखून असल्याचे सिद्ध होत आहे. बंजारा समाजाव्यतिरिक्त स्थानिक पशुपालकांकडून देखील उमरडा गोवंशाचा सांभाळ केला जात आहे. पश्चिम विदर्भातील यवतमाळ जिल्हा व लगतच्या अमरावती आणि वाशीम जिल्ह्यात अंगकाठीने उंचपुरी, पांढऱ्याशुभ्र रंगाच्या गोधनाचा सांभाळ बंजारा समाजाकडून पारंपरिक पद्धतीने होत असून त्यांना उमरडा गोवंश म्हणून ओळखले जाते.

वाशीम जिल्ह्यातील 'उंबर्डा बाजार' या पशुधन बाजारपेठेवरून 'उमरडा' हे नाव स्थानिक गोवंशाला प्राप्त झालेले असून यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस तालुक्यावरून या गोवंशाला 'दिग्रस' किंवा बंजारा समाजावरून 'बंजारा गोवंश' म्हणून देखील संबोधले जाते. यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस, दारव्हा, आर्णी तालुके, वाशीम जिल्ह्यातील मानोरा, मंगरुळपीर, कारंजा (लाड) हे तालुके आणि अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर या तालुक्यात मोठ्या संख्येने उमरडा गोवंश आढळून येतो.

मुख्यतः धनगर आणि रामोशी समाजातील मेंढपाळ/शेतकरी या मेंढ्या पाळतात. मेंढ्यांचे कळप स्थलांतरित आहेत. विषम हवामानात परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता, उत्तम रोग प्रतिकारशक्ती, जलद वजन वाढवण्याची क्षमता, कोकरू जगण्याची अधिक क्षमता, मातृत्वाची चांगली प्रवृत्ती आणि चांगला कळप आणि मटण उत्पादनासाठी फायदेशीर अशा गुणवैशिष्ट्यांमुळे माडग्याळ मेंढ्या दिवसेंदिवस लोकप्रिय होत आहेत. मेंढपाळांच्या मते माडग्याळ मेंढीची उत्पत्ती सुमारे १०० वर्षांपूर्वी सांगली जिल्ह्यातील माडग्याळ आणि सनमाडी गावात स्थानिक मेंढीपालकांनी निवड पैदास पद्धतीने केली आहे. माडग्याळ मेंढ्या झपाट्याने वजन वाढवण्याची क्षमता दर्शवतात. माडग्याळ ही महाराष्ट्रातील मोठ्या आकाराची आणि मटणासाठी विशेष लोकप्रिय मेंढी आहे. प्रामुख्याने पांढऱ्या रंगावर तपकिरी ठिपके आढळतात तर काही मेंढ्या तपकिरी देखील दिसतात.

## संपादकीय....

# वाहनचालकांना नोटिसा

महाराष्ट्रात व्यावसायिक प्रवासी वाहने चालविणाऱ्या चालकांना प्रवाशांशी सुसंवाद साधता यावा, यासाठी व्यवहारिक मराठी भाषेचे ज्ञान अनिवार्य करण्यात आले आहे. या नियमाच्या अंमलबजावणीसाठी आजपासून राज्यभर तपासणी मोहीम सुरू करण्यात आली आहे. ज्या चालकांना व्यवहारिक मराठीचे ज्ञान नसल्याचे तपासणीत आढळेल, त्यांना नोटीस बजावून एक महिन्याच्या कालावधीत मराठी भाषा शिकणे बंधनकारक करण्यात येत आहे. या मुदतीत मराठीचे ज्ञान आत्मसात न केल्यास संबंधित चालकाचा बॅज तीन महिन्यांसाठी निलंबित करण्यात येईल असा कारवाईचा ईशारा परिवहन मंत्र्यांनी नुकताच दिला. मुंबई महानगर क्षेत्रात आज झालेल्या तपासणीत ३,९९५ वाहनचालकांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ६०४ चालकांना व्यवहारिक म राठीचे पुरेसे ज्ञान नसल्याचे आढळून आले असून, या सर्वांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. उर्वरित राज्यातील आकडेवारीनुसार आतापर्यंत ४,२२२ चालकांची तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी ६६४ चालकांना नोटिसा देण्यात आल्या आहेत. महाराष्ट्रात व्यवसाय करून प्रवाशांशी थेट संवाद साधणाऱ्या व्यावसायिक वाहनचालकांना व्यवहारिक मराठी येणे ही केवळ नियमांची बाब नाही, तर प्रवाशांच्या सोयी-सुरक्षेशी संबंधित बाब आहे. चालकांना मराठी शिकण्यासाठी पुरेसा कालावधी दिला जात आहे. मात्र, दिलेल्या मुदतीनंतरही नियमाचे पालन न करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले. ही तपासणी मोहीम ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे. तपासणीदरम्यान चालकांना व्यवहारिक मराठीचे ज्ञान तपासले जाईल. मराठीचे ज्ञान नसलेल्या चालकांना सुधारणा करण्याची संधी देण्यात येणार असली, तरी त्यानंतरही नियमांचे पालन न करणाऱ्यांविरोधात विहित मुदतीनंतर बॅज निलंबनाची कारवाई करण्यात येणार आहे. मराठी शिकण्यासाठी संधी आहे; नियम टाळण्यासाठी मुभा नाही, असा स्पष्ट संदेश परिवहन विभागाने या मोहिम ेच्या माध्यमातून दिला आहे. असे प्रतिपादन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले.

# वेळ हीच संपत्ती : मानवतेचा ‘टाइम बँक’

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मानवी जीवनात पैसा, संपत्ती, सत्ता आणि ऐश्वर्याला आपण मोठे महत्त्व देतो. मात्र या सर्वांपेक्षा अमूल्य गोष्ट म्हणजे वेळ. पैसा गमावला तर पुन्हा कमावता येतो, संपत्ती गमावली तर पुन्हा मिळवता येते; परंतु एकदा निघून गेलेला वेळ कोणतीही किंमत मोजून परत मिळवता येत नाही. याच अमूल्य वेळेला मानवसेवेशी जोडून समाजाच्या कल्याणासाठी वापरण्याची संकल्पना म्हणजे ‘टाइम बँक’.

सामान्य बँकेत आपण पैसा जमा करतो आणि गरजेच्या वेळी तो परत काढतो. मात्र ‘टाइम बँक’मध्ये पैशांऐवजी इतरांसाठी दिलेला वेळ जमा केला जातो. आज आपण निरोगी आणि सक्षम असताना ज्येष्ठ नागरिक, एकाकी व्यक्ती, अशक्त किंवा मदतीची गरज असलेल्या व्यक्तींसाठी काही तास सेवा देतो. त्या सेवेची नोंद ठेवली जाते. भविष्यात आपण वृद्ध झालो, आज-ारी पडलो किंवा आपल्याला मदतीची गरज निर्माण झाली, तर समाजातील इतर व्यक्तींकडून आपल्याला सेवा मिळू शकते.

ही केवळ सामाजिक योजना नसून मानवी नात्यांना नवा अर्थ देणारी संकल्पना आहे. वृद्ध व्यक्तींसोबत संवाद साधणे, त्यांच्यासाठी औषधे आणणे, दैनंदिन कामात मदत करणे, रुग्णालयात सोबत जाणे, फिरायला घेऊन जाणे, बाजारातून आवश्यक वस्तू आणणे किंवा काही वेळ त्यांच्यासोबत बसून आपुलकीने बोलणे-या साध्या सेवांनाही ‘टाइम बँक’मध्ये मोठे महत्त्व आहे.



कारण वृद्धांना प्रत्येक वेळी पैशांची गरज असतेच असे नाही; अनेकदा त्यांना आपले म्हणणारे कोणीतरी ऐकावे, हातात हात द्यावा आणि एकटेपणा दूर करावा, अशी अधिक गरज असते.

या संकल्पनेचा सर्वात सुंदर पैलू म्हणजे येथे पैशांपेक्षा मानवतेला मूल्य मिळते. सेवा करणारी व्यक्ती आपला वेळ वाया घालवत नसते, तर ती स्वतःच्या भविष्यासाठी एक प्रकारची सामाजिक सुरक्षितता निर्माण करत असते. त्याच वेळी सेवा घेणाऱ्या ज्येष्ठांना शारीरिक मदतीसोबत प्रेम, सन्मान, आपुलकी आणि मानवी स्पर्श मिळतो.

आजच्या आधुनिक जीवनशैलीत ज्येष्ठ नागरिकांचा एकटेपणा ही मोठी सामाजिक समस्या बनत आहे. रोजगार, शिक्षण आणि जीवनाच्या गरजांमुळे मुले दूरच्या शहरांत किंवा परदेशात स्थायिक होतात. परिणामी वृद्ध आई-वडिलांना स्वतःच्या घरात एकट्याने जीवन जगा-वे लागते. कुटुंबातील सदस्य जवळ असले तरी वेळेअभावी वृद्धांशी संवाद साधणे किंवा त्यांच्या गरजा समजून घेणे अनेकदा शक्य होत नाही.

अशा परिस्थितीत ‘टाइम बँक’ व्यवस्था अत्यंत उपयुक्त ठरू शकते. एखाद्या वृद्ध व्यक्तीसोबत दररोज केवळ एक तास कोणी बोलले, तरी त्यांना मोठा मानसिक आधार मिळू शकतो. रुग्णालयात जाताना कोणी सोबत असेल तर त्यांची भीती कमी होऊ शकते. दैनंदिन कामात थोडी मदत मिळाल्यास त्यांचा आत्मविश्वास वाढू शकतो. त्यामुळे वेळेचे दान हे अनेकदा वस्तूंच्या दानापेक्षा अधिक मौल्यवान ठरते.

आपल्या देशातही स्थानिक पा-तळीवर ‘टाइम बँक’सारखी व्यवस्था उभारण्याचा विचार व्हायला हवा. ग्रामपंचायत, नगरपालिका, स्वयंसेवी संस्था, युवक संघटना, रोटरी, लायन्स यांसारख्या सेवाभावी संस्था तसेच विविध सामाजिक संघटना यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. युवक, विद्यार्थी, निवृत्त नागरिक आणि समाजसेवेची आवड असणाऱ्या व्यक्तींनी आठवड्यातील काही तास समाजसेवेसाठी देऊ शकतात. त्यांनी दिलेल्या वेळेची डिजिटल किंवा साध्या नोंदणी पद्धतीने नोंद ठेवता येऊ शकते.

ही व्यवस्था केवळ ज्येष्ठ नागरिकांच्या सेवेसाठी मर्यादित न राहता दिव्यांग व्यक्ती, एकाकी जीवन जगणारे नागरिक, तात्पुरते आजारी असलेले लोक आणि आपत्कालीन परिस्थितीत मदतीची गरज असणाऱ्यांसाठीही उपलब्ध करून देता येईल. अशा पद्धतीने ही संकल्पना केवळ योजना न राहता मानवता जपणारी सामाजिक चळवळ बनू शकते.

याचा आणखी एक महत्त्वाचा फायदा म्हणजे समाजात परस्पर विश्वास आणि सहकार्याची भावना वाढेल. ‘आज मी तुझ्यासाठी वेळ देतो; उद्या मला गरज पडली तर समाज माझ्यासोबत उभा राहील,’ असा विश्वास निर्माण होईल. नातेसंबंधही पैशाच्या आधारावर मोजले जात असलेल्या आजच्या काळात अशी व्यवस्था म ानवी मूल्यांना नवसंजीवनी देऊ शकते.



लहान मुलांनाही बाल-पणापासून वेळेचे महत्त्व आणि सेवाभाव शिकवायला हवा. आठवड्यातील काही तास वृद्धाश्रमाला भेट देणे, ज्येष्ठांशी संवाद साधणे किंवा समाजसेवेसाठी देणे अशी सवय लागली, तर पुढची पिढी अधिक संवेदनशील आणि जबाबदार बनेल. शैक्षणिक संस्थांनीही ‘समयदान’ हा सामाजिक सेवेचा भाग करण्याचा विचार करायला हवा.

शेवटी, जीवनातील खरी संपत्ती आपण किती पैसा कमावला यामध्येच नसते. आपल्या वाट्याला आलेला अमूल्य वेळ किती लोकांच्या जीवनात आनंद, आधार, समाधान आणि आशा निर्माण करण्यासाठी वापरला, यात जी-वनाचे खरे सार दडलेले आहे.

पैशाच्या बँकेत पैसा जमा केला तर वैयक्तिक सुरक्षितता मिळू शकते; पण ‘टाइम बँक’मध्ये वेळ जमा केला तर मानवी नात्यांची सुरक्षितता मिळते.

म्हणून ‘टाइम बँक’ ही केवळ एक योजना नाही, तर उद्याच्या समाजासाठी आज पेरायचे मानवतेचे बीज आहे. आपण दिलेला एक तास एखाद्याच्या आयुष्यातील एक दिवस आनंदाचा ठरू शकतो. आपला एक प्रेमळ शब्द एखाद्याचा एकटेपणा दूर करू शकतो. आपली छोटीशी मदत उद्या आपल्यासाठी मोठा आधार ठरू शकते.

पैसा जतन करण्यासोबत वेळही जतन करूया; पण तो केवळ स्वतःसाठी न ठेवता मानवसेवेच्या रूपाने समाजाला देऊया. कारण आपण समाजाला दिलेला वेळच गरजेच्या वेळी समाजाकडून आपल्याला परत मिळणारी खरी संपत्ती आहे.

**लेखन: निंगप्पा निंबाळ**

# रंगारी गुरुजींनी जपलाय विविध नाण्यांचा संग्रह....!

## १८६९ ते २०२६ : दुर्मीळ नाण्यांसह नोटाही जपून ठेवल्या



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुन्नाभाई नंदागवळी

गोंदिया : अनेकांना वेगवेगळ्या प्रकारचा छंद असतो आणि त्यांचा हा छंद एक दिवस इतरांसाठी कौतुकाचा विषय ठरतो. पेशाने सेवानिवृत्ती शिक्षक असलेले के.ए. रंगारी हे त्यापैकीच एक. १८६९ पासून तर आजपर्यंतच्या विविध चिल्लर नाण्यांचा आणि नोटांचा संग्रह करून करून त्यांनी हा दुर्मिळ अनमोल ठेवा जपून ठेवला आहे.

मूळचे सालई बोळदे येथील रहिवासी असलेले के ए रंगारी हे नवेगावबांधच्या भागिरथी आत्माराम डोंगरवार हायस्कूलमधून शिक्षक म्हणून नोकरी करताना तिथेच स्थायिक झाले होते. आता ते सेवानिवृत्त झाले. रंगारी वयाच्या १५ व्या वर्षापासून नाणे संग्रह करीत आहेत. एक पैशापासून तर २० रुपयाच्या नाण्यापर्यंतची सर्व नाणी त्यांच्या संग्रही आहेत.

रंगारी यांच्या संग्रहामध्ये एक पैसा, दोन पैसा, तीन पैसा, पाच पैसे असे सेवानिवृत्त शिक्षक रंगारी यांच्या संग्रही असलेल्या एक-एक प्रकार, १० पैशाचे तीन प्रकार, यामध्ये जर्मन, पितळ व राजमुद्रा असलेले नाणे आहेत. २० पैसे तीन प्रकारचे आहेत. यामध्ये महात्मा गांधी कमलपुष्प व राजमुद्रेचे, २५ पैशामध्ये गेंडा छाप व राजमुद्रा असलेले. ५० नाण्यांपैकी काही निवडक नाणी.

इंदिरा गांधी, हाताचा पंजा, संसद भवन व राजमुद्रा असलेले तसेच पितळीचे ३ प्रकार आहेत. एक रुपयाची १० प्रकारची नाणी रंगारी यांच्याकडे आहे. त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पं. जवाहर आंतरराष्ट्रीय परिवार, राष्ट्रमंडल, संसद संमेलन, पर्यटन वर्ष, भारत छोडो आंदोलन, सुवर्ण जयंती असे वेगवेगळ्या निमित्ताने काढलेल्या नाण्यांचा समावेश आहेत. दोन रुपयामध्ये २ नोटेचे प्रकार, त्यात याधाचे प राजमुद्रेचे तसेच नाणे आठ प्रकारचे आहेत.


यामध्ये नकाशा, शिवाजी महाराज, सुभाष बॉस, सम्राट अशोक चक्र, उ न्यायानमार, शेक्षा बाजार, सादार पटेल, समावेश आहे. पाच रुपयांचे प्रकार आहेत. यामध्ये महात्मा बसवेश्वर जयाहाला नेहरू थम जगत, स्वच्छता गच्छ शिशु, भाई नवरोजी, महात्मा गांधी, भगवान महापौर, स्टेट बँक, मदनमोहन नालवियः समुद्र लहर, नागरी विमान वाहतूक शताब्दी, राष्ट्रमंडल, संयुक्त राष्ट्र मंड रवींद्रनाथ टागोर, भारतीय रिझर्व बैंक, वाणज्य, आयकर विभाग, भारत सरकार व राजम ुद्रा आदी प्रकार उपलब्ध आहे.

दहा रुपयामध्ये दोन



नोटरीचे प्रकार व दोन नाण्यांचे प्रकार असून हार, महात्मा गांधी व राजमुईचे पिलीव लोखंडी नाणे आहेत. एक रुपयामध्ये संसदीय ३६ नाणीवह आंबेडकर यांची नाणी त्यांनी रोजच्या व्यवहारापूर संग्रहित केली आहेत. ग्रामीण भागात राहून अशा प्रकारे रंगारी यांनी जपलेला हा छंद अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.



























हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# महात्मा ज्योतिबा फुले समग्र वाङ्मय ग्रंथाचा सात भाषांमध्ये अनुवाद करणार

## सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांची घोषणा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाच्या निमित्ताने महाराष्ट्र शासनातर्फे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या समग्र वाङ्मयाचा ग्रंथ हिंदी, सिंधी, गुजराती, संस्कृत, तेलुगु, बंगाली आणि गोर बंजारा या सात भाषांमध्ये अनुवाद करण्यात येईल, अशी घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केली.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत हिंदी, सिंधी, गुजराती, संस्कृत, तेलुगु, बंगाली आणि गोर बंजारा या भाषांसाठी साहित्य अकादमी कार्यरत आहेत. या साहित्य अकादमींच्या माध्यमातून साहित्यिक आदान-प्रदानाला प्रोत्साहन देण्यासाठी आज प्रभादेवी येथील पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येथे एक दिवशीय अनुवाद कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते करण्यात आले.

मराठीतील उत्कृष्ट साहित्यकृतींचा विविध भाषांमध्ये तसेच विविध भाषांतील उत्कृष्ट साहित्यकृतींचा मराठीत अनुवाद करण्यास प्रोत्साहन देणे, हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश आहे.

यावेळी मंत्री ॲड. शेलार यांनी मराठी भाषेतील दर्जेदार वाङ्मय अन्य भाषांमध्ये गेले पाहिजे तसेच अन्य भाषांमधील वाङ्मय ही आपल्या भाषेत आले पाहिजे. भाषेला समृध्द करण्यासाठी अशा प्रकारचे आदान प्रदान महत्वाचे असून यावर्षी महात्मा ज्योतिबा फुले यांचे द्विशतब्दी जयंती वर्ष असून भारत सरकार आणि महाराष्ट्र शासन यानिमित्ताने विविध उपक्रम राबविणार आहे. याचाच एक भाग म्हणून महात्मा ज्योतिबा फुले यांचे वाङ्मय आपण या साहित्य अकादमीतर्फे सर्व सात भाषांमध्ये अनुवाद करु या, त्यासाठी आवश्यक ती सगळी मदत शासन करेल, असे त्यांनी जाहीर केले. या उपक्रमातंर्गत महात्मा ज्योतिबा फुले चरित्र साधन प्रकाशन समितीने २०१२ ला प्रकाशित केलेले महात्मा ज्योतिबा फुले समग्र वाङ्मय हा ८६१ पानांचा ग्रंथ सात भाषांमध्ये अनुवादीत करण्यात येणार आहे.

प्रख्यात लेखिका मंजिरी धामणकर, डॉ. शितला प्रसाद दुबे, अजित मन्याल, आलोक सिंह, प्रशांत वर्मा यांच्यासह अकदामीचे सचिव सचिन निबांळकर आदींसह विविध भाषेतील अनुवादक तसेच अभ्यासक सहभागी झाले होते.

# विद्यार्थ्यांनी कर्मवीरांचे गुण अंगी बाणावे : प्रा. अशोक सोनवणे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




निफाड/प्रतिनिधी : ओझर येथील मविप्र समाजाचे, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात समाज दिनानिमित्त प्रा. अशोक सोनवणे यांचे व्याख्यान संपन्न झाले. अध्यक्षस्थानी नानासाहेब बोरस्ते होते. 'बहुजन हिताय,बहुजन सुखाय' हे ब्रीदवाक्य घेऊन १९१४ मध्ये लावलेल्या नाशिक जिल्ह्यातील मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या या छोट्याश्या रोपट्याचे आज गुणात्मक विकासाच्या माध्यमातून एका विशाल अशा वटवृक्षात रूपांतर झालेले आहे. मात्र यासाठी अनेक कर्मवीरांनी समाजसेवेचे व्रत हाती घेऊन संस्थेला एका नव्या उंचीवर नेले आहे. आज संस्थेचे आद्यसंस्थापक कर्मवीर रावसाहेब थोरात यांचा जन्मदिवस संस्थेच्या नाशिक जिल्ह्यातील एकूण ५०२ शाखामध्ये समाज दिन म्हणून साजरा केला जातो.. कर्मवीरांबरोबरच याक्षेत्रात योगदान देणारे वाघ गुरुजी सरदार निमसे, विठोबा पाटील हे आणि यांच्या सारखेच कितीतरी लोकांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे ते म्हणाले. बहुजनांच्या मुलांना शिक्षण मिळावे यासाठी सर्वच कर्मवीरांनी अक्षरशः आपल्या जीवाचेरान केले असे प्रतिपादन प्रमुख वक्ते प्रा.अशोक सोनवणे यांनी केले. समाज दिन कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर वरिष्ठ महाविद्यालय विकास समिती अध्यक्ष. नानासाहेब बोरस्ते, कनिष्ठ महाविद्यालय विकास समिती अध्यक्ष किशोर कदम, श्रीमती भारती पाटील, रतन ढिकले, कोंडाजी चौधरी, घनश्याम चौधरी आदी महाविद्यालय विकास समिती सदस्य तसेच मा. प्राचार्य डॉ. डी. डी. लोखंडे, उपप्राचार्य प्रा. एस के. आवारे, डॉ. डी.एस. बोराडे, डॉ. ए.डी. कदम, कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख प्रा.ए.टी. टर्ले व्होकेशल विभाग प्रमुख प्रा.संजय पवार उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. डी.लोखंडे यांनी प्रास्ताविक केले. प्रास्ताविकातून ते म्हणाले की, कर्मवीरांचे कार्य हे दीपस्तंभासारखे असून खेड्यापाड्यातील बहुजन समाजातील अज्ञान, अंध:कार दूर करून त्यांना योग्य दिशा दाखविण्याचे महान कार्य कर्मवीरांनी केले. समाजाचे प्रभावी परिवर्तन शिक्षण करते हा मूलमंत्र कर्मवीरांनी समाजाला दिला असे सांगून संस्थेच्या इतिहासाला त्यांनी उजाळा दिला. अध्यक्षीय मनोगतातून मा. आ. नानासाहेब बोरस्ते यांनी शिक्षण क्षेत्रातील गुणवत्ता टिकवण्याचे काम हे कोणा एका व्यक्तीचे नसून त्यासाठी शिक्षक, प्राध्यापक व विद्यार्थी यांनी योगदान द्यावे. कर्मवीरांचे विचार, कर्तुत्व, त्याग, जिद्द,चिकाटी, मेहनत इ.समाजापर्यंत पोहोचविणे महत्वाचे आहे अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी गुणवंत प्राध्यापक, विद्यार्थी यांचा सत्कार करण्यात आला. प्रा. बी. टी. शिंदे डॉ.एम. पी. दुशिंग, श्रीमती.एस. डी.डांगळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. तर डॉ. डी. एस. बोराडे यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# क्रांतीसूर्य अण्णासाहेब पाटील सोशलवर्क कॉलेजमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव प्रतिनिधी/ सुधाकर रणदिवे : धाराशिव येथील क्रांतीसूर्य अण्णासाहेब पाटील सोशलवर्क कॉलेजमध्ये स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात, देशभक्तीपूर्ण वातावरणात आणि विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी, प्राध्यापकांनी व महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत स्वातंत्र्यदिनाचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. राकेश जानराव ( सहाय्यक वाहतूक अधीक्षक,) विभागीय कार्यालय , महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, धाराशिव. यांची उपस्थिती लाभली. त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत उपस्थितांनी राष्ट्रगीत गायन केले. संपूर्ण परिसरात देशभक्तीचा उत्साह निर्माण झाला होता.

ध्वजारोहणानंतर उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. राकेश जानराव यांनी स्वातंत्र्यसंग्रामातील क्रांतिकारकांच्या त्यागाचे स्मरण करून विद्यार्थ्यांनी देशाच्या प्रगतीमध्ये आपले योगदान देण्याचे आवाहन केले. शिक्षण, सामाजिक बांधिलकी, संविधानिक मूल्ये आणि जबाबदार नागरिकत्व यांचा अंगीकार करून समाजाच्या विकासासाठी कार्य करणे हीच स्वातंत्र्यसैनिकांना खरी आदरांजली ठरेल, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन करण्यात आले. सामाजिक कार्याच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचून त्यांच्या समस्या समजून घेणे आणि त्यावर सकारात्मक पद्धतीने काम करणे आवश्यक असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच सामाजिक जाणीव आणि राष्ट्रीय कर्तव्याची भावना जोपासावी, असा संदेशही देण्यात आला.

या कार्यक्रमाला संस्थेचे सचिव कुलदीप सावंत, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. एस. काझी, प्रा. प्रमोद गायकवाड, प्रा. हनुमंत गरड, प्रवीण साळुंके, अजिंक्य वराळे, पवन नाईक, अभि घुटे, समाधान थोडसे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालय परिसरात आकर्षक सजावट करण्यात आली होती. तिरंगी रंगांच्या पताका आणि देशभक्तीपर वातावरणामुळे कार्यक्रमाला विशेष उत्साह प्राप्त झाला. विद्यार्थ्यांमध्येही राष्ट्रीय एकात्मता, देशप्रेम आणि सामाजिक बांधिलकीची भावना जागृत करणारे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. बापू भारते यांनी प्रभावीपणे केले. तर आभार प्रदर्शन प्रा. राहुल शिरसाठ यांनी केले. उपस्थित मान्यवर, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे त्यांनी आभार मानले.

क्रांतीसूर्य अण्णासाहेब पाटील सोशलवर्क कॉलेजमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या स्वातंत्र्यदिन सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांना देशाच्या स्वातंत्र्याचा इतिहास, स्वातंत्र्यसैनिकांचे बलिदान आणि वर्तमान काळातील नागरिकांची जबाबदारी यांची जाणीव करून देण्यात आली. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमातून 'देशप्रेम, सामाजिक बांधिलकी आणि जबाबदार नागरिकत्व' हा सकारात्मक संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला.

# मोहा येथे विविध ठिकाणी स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रविण कसबे/ मोहा प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील मोहा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा,मोहा ग्रामपंचायत कार्यालय तसेच विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीत ८० वा भारतीय स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

मोहा ग्रामपंचायत कार्यालयात तिरंगा ध्वज सरपंच सौ. सिमा मडके यांच्या हस्ते फडकविण्यात आला.

तसेच जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी येथे सोसायटीचे चेअरमन गौतमराव मडके यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. व विद्यार्थ्यांना गोड खाऊचे वाटप करून गावातून प्रभात फेरी काढण्यात आली. यावेळी मान्यवर व गावातील प्रतिष्ठित नागरिकांची मोठी उपस्थिती होती.तसेच ध्वजारोहण झाल्यानंतर ग्राम पंचायतीकडून नवोदयधारक व शिष्यवृतीधारक गुणवंत विद्यार्थ्यांचा व पालकांचा सत्कार करण्यात आला.यामध्ये नवोदयधारक जैयद इस्लाम शेख शिष्यवृत्तीधारक प्रांजली बन्सी कसबे व तक्षशिला कसबे व वंदेही भारत जोशी या शिष्यवृत्तीधारकाने मोठे यश संपादन करून ग्रामीण भागातून जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.व व्यंकटेश सुनील मडके पाटील याने मोठ्या मेहनतीने व चिकाटीने वैद्यकीय क्षेत्रात एम.बी.बी.एस.मध्ये मोठे यश संपादन केले आहे.या सर्व

मोहा येथे विविध ठिकाणी स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

गूणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सरपंच सौ.सिमा मडके व मा. जिल्हा परिषद सदस्य संदीप मडके,संजय मडके व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.तसेच जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक (कन्या) शाळेतील इयत्ता चौथीची विद्यार्थीनी प्रांजली बन्सी कसबे हिने चिकाटी व सातत्यपूर्ण मेहनतीने शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण होऊन कळंब तालुक्यात दहाव्या क्रमांकाने यश संपादन केले असल्याने प्रांजलीचे मार्गदर्शक शिक्षक पवार सर यांचे मोठे मार्गदर्शन लाभल्याने पालकांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.याप्रसंगी उपसरपंच बशारत मोमीन, सर्व ग्राम पंचायत सदस्य, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी संचालक, पोलिस पाटील व शाळेचे विद्यार्थी, शिक्षकवृंद व गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# भाजपा घाटकोपर पश्चिम विधानसभा अनिल(भाई)निर्मळे यांच्या माध्यमातून गणेशोत्सव निमित्त कोकणवासीयांसाठी मोफत एस.टी.बस सेवेचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : कोकणातील सर्वांत मोठ्या आणि उत्साहात साजरा होणाऱ्या गणेशोत्सवासाठी मुंबईतून गावी जाणाऱ्या चाकरमान्यांचा प्रवास अधिक सुखकर व सोयीचा व्हावा,यासाठी भारतीय जनता पार्टी (घाटकोपर पश्चिम विधानसभा) यांच्या वतीने श्री गणेशवारी कोकणची... साथ भाजपाची' या उपक्रमांतर्गत मोफत एस.टी.बस सेवेचे भव्य आयोजन करण्यात आले आहे.गणेशोत्सवाच्या काळात कोकणात जाणाऱ्या गाड्यांचे बुकिंग काही मिनिटांत फुल्ल होते,तर दुसरीकडे खाजगी ट्रॅव्हल्स चालकांकडून अवाजवी भाडे उकळले जाते.या आर्थिक भुर्दंडापासून कोकणवासीयांना दिलासा देण्यासाठी आणि गणेश भक्तांची सेवा करण्याच्या उद्देशाने भाजपा ईशान्य मुंबई जिल्हा उपाध्यक्ष अनिल(भाई)निर्मळे यांच्या संकल्पनेतून ही मोफत एस.टी.बस सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे.या प्रवास नोंदणी आणि या मोफत बस सेवेचा लाभ घेण्याकरिता गणेश भक्तांनी वेळेत आपली नोंदणी करणे आवश्यक आहे.अधिक माहिती व नावनोंदणीसाठी पुढील बस संपर्क प्रमुखांशी त्वरित संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.महेश गुप्ता-९१३७५६१४५० ; दत्तकुमार सोनावणे-९५९४६६२९९९: कृष्णा सकपाळ-९००४८५७८१५; सिद्धू दसुरे-९१३७२८२४८८;आप्पा पालांडे-९७०२२९३७३३; रवींद्र शिगवण-९३२४७९४७२८ तसेच या स्तुत्य उपक्रमामुळे घाटकोपर परिसरातील कोकणवासीयांना मोठा आर्थिक व प्रवासाचा दिलासा मिळाला असून, भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.श्री.अनिल(भाई)निर्मळे व संपूर्ण भारतीय जनता पार्टी घाटकोपर पश्चिम विधानसभेकडून सर्व भाविकांना गणेशोत्सवाच्या भक्तीमय शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

## कल्याणशेट्टी महाविद्यालयात राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टिकोन दिनानिमित्त कार्यक्रम

# अंधश्रद्धा, अवैज्ञानिक समजूतीमुळे समाज दिशाहीन, डॉक्टर नरेंद्र दाभोळकर यांच्या विचाराची गरज : मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : आधुनिक युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे मानवी जीवनात परिवर्तन झाले आहे, असे असून देखील अंधश्रद्धा, अफवा आणि अवैज्ञानिक समजुती मुळे समाजाची अवस्था दिशाहीन झाली आहे. अशा स्थितीत डॉक्टर नरेंद्र दाभोळकर यांच्या विचारांची गरज आहे असे मत मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.



महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील विज्ञान विद्याशाखा व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टिकोन दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, पुनम कोकळगी, रूपाली शहा, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.

### डॉ. नरेंद्र दाभोळकर यांचे विवेकवादी कार्य उल्लेखनीय

**डॉक्टर नरेंद्र दाभोळकर यांनी समाजातील अंधश्रद्धा रूढी परंपरा यांना तिलांजली मिळावी म्हणून आयुष्यभर प्रयत्न केले, त्यांनी विवेक वाहिनी ही वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणारी संघटना कार्यान्वित केली. त्यामुळे विज्ञान व तर्क यांना महत्त्व प्राप्त झाले हे त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे असे प्रतिपादन पुनम कोकळगी यांनी केले.**

पुढे ते म्हणाले की, आजचा राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टिकोन दिवस ज्येष्ठ समाजसुधारक डॉ नरेंद्र दाभोळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त पाळला जातो. आपल्याला प्रश्न विचारा, पुरावा तपासा आणि सत्य स्वीकारा हा संदेश त्यांनी दिला वैज्ञानिक दृष्टिकोनातून विचार करणारा समाज अधिक प्रगत, विवेकी आणि सक्षम बनतो. असेही त्यांनी सांगितले. म्हणूनच अंधश्रद्धामुक्त आणि प्रगत भारताच्या निर्मितीसाठी प्रत्येक नागरिकाने वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले, सूत्रसंचलन प्राध्यापिका डॉ शितल झिंगाडे भस्मे यांनी केले, आभार प्राध्यापक सौरभ भस्मे यांनी मानले. कार्यक्रमास प्रा विद्याश्री वाले, प्रा विद्या बिराजदार, प्रा हर्षदा गायकवाड, प्रा भीम सोनकांबळे, प्रा जनाबाई चौधरी, डॉ बाळासाहेब पाटील, प्रा सोनाली कटकधोंड, प्रा प्राची गणेचारी उपस्थित होते.

**वैज्ञानिक दृष्टिकोन दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी घेतली शपथ**

१ रूढी परंपरा अंधश्रद्धा नाहीशा करण्यासाठी प्रयत्न करेन

२ भोंदू बाबा च्या आहारी जाणार नाही

३ समाजामध्ये अनिष्ट रूढी नष्ट करण्यासाठी प्रयत्न करेन

४ विवेक वादी दृष्टिकोन स्वीकारेन

५ वैज्ञानिक जाणीवा प्रगल्भ व्हाव्यात यासाठी समाजाचे प्रबोधन करेन

६ स्वातंत्र्य, समता, बंधुता धर्मनिरपेक्षता या संविधानिक मूल्यावर निष्ठा ठेवेन

अशी शपथ राष्ट्रीय वैज्ञानिक दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी घेतली

# पारसीवाडी येथे २२ ऑगस्ट रोजी आरोग्य शिबिराचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : विभाग क्रमांक १९ मधील नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याबरोबरच विविध आजारांचे वेळीच निदान व्हावे,या उद्देशाने पारसीवाडी येथील पा. रा. कदम हॉल येथे शनिवार, २२ ऑगस्ट २०२६ रोजी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आमदार राम कदम यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच भाजपा कार्यकर्त्यांच्या सहकार्याने हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे.या आरोग्य शिबिरात विविध तज्ज्ञ डॉक्टरांकडून नागरिकांची मोफत तपासणी करण्यात येणार असून,आवश्यकतेनुसार औषधोपचार व औषधांचे वाटपही करण्यात येणार आहे. यामध्ये रक्तदाब व मधुमेह तपासणी, नेत्र तपासणी, दंत तपासणी, मोफत रक्त तपासणी, क्षयरोग तपासणी, आहारतज्ज्ञांचा सल्ला, बालरोग तज्ज्ञ, अस्थिरोग तज्ज्ञांची तपासणी, महिलांसाठी विशेष आरोग्य तपासणी तसेच लहान मुलांची आरोग्य तपासणी अशा विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच नागरिकांसाठी आभा कार्ड व आयुष्मान भारत कार्ड नोंदणी, योग प्रशिक्षण आदी सुविधाही शिबिरात उपलब्ध असतील. त्यामुळे नागरिकांना एकाच ठिकाणी विविध आरोग्य तपासण्या व आवश्यक मार्गदर्शन मिळणार आहे.विभागातील नागरिकांनी मोठ्या संख्येने या आरोग्य शिबिरात सहभागी होऊन उपलब्ध सुविधांचा लाभ घ्यावा आणि आपल्या आरोग्याची योग्य ती तपासणी करून घ्यावी, असे आवाहन एन वॉर्ड प्रभाग समितीच्या अध्यक्षा व प्रभाग क्रमांक १२९च्या नगरसेविका अश्विनी भरत मते यांनी केले आहे.

नोंदणी व संपर्काची माहिती:

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ५ सप्टेंबर २०२६ पर्यंत आपले नाव, मोबाईल नंबर, पत्ता, एकपात्रिकेचा विषय व कालावधी व्हॉट्सपवर पाठवणे अनिवार्य आहे. स्पर्धेची तारीख, वेळ व ठिकाण ७ दिवस आधी कळवले जाईल. अधिक माहिती व नोंदणीसाठी श्री. निखिल मोहन कटारे (९८२१४८३९३२), श्री. अविनाश बळवंत राऊत (७९७७६२७४३०) किंवा श्री. महेश्वर भिकाजी तेटांबे (९०८२२९३८६७ / ८८७९८१०२९८) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# ठाणे ग्रामीणमध्ये सत्ताधारी राष्ट्रवादीला जोरदार धक्का!

## भरतभाऊ गोंधळेंसह बड्या पदाधिकाऱ्यांची घरवापसी; शेकडो कार्यकर्त्यांचा शरदचंद्र पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे । प्रतिनिधी : विजय घन-घाव / प्रफुल्ल शेवाळे : ठाणे जिल्हा ग्रामीणच्या राजकारणात बुधवारी मोठा राजकीय भूकंप झाला. सत्ताधारी अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसला जोरदार धक्का देत कल्याण झचउ चे माजी अध्यक्ष, विद्यमान संचालक तथा राष्ट्रवादीचे माजी जिल्हाध्यक्ष भरतभाऊ गोंधळे यांच्यासह अनेक प्रमुख पदाधिकारी आणि शेकडो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केला. त्यामुळे ठाणे ग्रामीण आणि कल्याण परिसरातील राष्ट्रवादीच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

ठाणे येथील पक्ष कार्यालयात झालेल्या या शक्तिप्रदर्शनाच्या कार्यक्रमाला आमदार जितेंद्र आव्हाड यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जिल्हाध्यक्ष मनोज प्रधान, पक्षाचे अधिकृत प्रवक्ते महेश तपासे, ठाणे महानगरपालिकेचे गटनेते अभिजीत पवार, महिला अध्यक्ष मनिषा भगत, युवक कार्याध्यक्ष राजेश कदम आणि माजी नगरसेवक मिलिंद बनकर यांच्यासह पक्षाचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

**गोंधळेंच्या प्रवेशाने समीकरणांना हादरा :-**

भरतभाऊ गोंधळे यांचा पक्षप्रवेश हा या संपूर्ण घडामोडीतील सर्वाधिक चर्चेचा विषय ठरला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष आणि कल्याण झचउ चे माजी अध्यक्ष म्हणून त्यांनी ठाणे ग्रामीण तसेच कल्याण परिसरात दीर्घकाळ संघटनात्मक काम केले आहे. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाखालील कार्यकर्त्यांची मोठी फळी शरदचंद्र पवार पक्षात दाखल झाल्याने अजित पवार गटासमोर संघटनात्मक आव्हान उभे राहिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

गोंधळे यांच्यासोबत ठाणे युवक अध्यक्ष वीरू वाघमारे, सरचिटणीस हेमंत वाणी, प्रदेश सचिव रविंद्र परटोले, ठाणे जिल्हा ग्रामीण उपाध्यक्ष ज्योती वाघमारे, बंजारा समाज कल्याणचे अध्यक्ष सागर राठोड आणि माजी युवती अध्यक्षा आम्रपाली लोखंडे यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि शेकडो कार्यकर्ते पक्षात दाखल झाले.

**ठाणे जिल्हा ग्रामीण राजकीय पटावर नव्या समीकरणांची नांदी; पक्षप्रवेशाने अजित पवार गटात खळबळ**

**घुसमट होत होती; मोकळा श्वास घेण्यासाठी स्वगृही परतलो!**

पक्षप्रवेशानंतर कार्यकर्त्यांनी व्यक्त केलेली प्रतिक्रिया या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. पक्षात घुसमट होत होती. मोकळा श्वास घेण्यासाठी आम्ही स्वगृही परतलो आहोत, अशी कार्यकर्त्यांची भावना आमदार जितेंद्र आव्हाड यांनी बोलून दाखवली आहे

या प्रतिक्रियेमुळे पक्षांतर्गत नाराजीचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला असून, ठाणे ग्रामीणमध्ये अजित पवार गटाच्या संघटनात्मक स्थितीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

**सत्ताधारी गटाला 'घरचा' धक्का**

राज्यात सत्तेत असलेल्या अजित पवार गटासाठी ठाणे ग्रामीणमधील हा पक्षप्रवेश राजकीयदृष्ट्या म हत्त्वाचा मानला जात आहे. सत्तेची ताकद असतानाही पक्षातील प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने विरोधी गटात दाखल होणे हा सत्ताधारी गटासाठी 'घरचा धक्का' असल्याची चर्चा रंगली आहे.

विशेषतः स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या पक्षप्रवेशाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. कल्याण, ठाणे ग्रामीण आणि परिसरातील स्थानिक राजकारणात या नेत्यांचा असलेला संपर्क आणि कार्यकर्त्यांचे जाळे लक्षात घेता, आगामी निवडणुकांमध्ये या घडामोडीचा परिणाम दिसून येण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

**शरदचंद्र पवार पक्षाचे शक्तिप्रदर्शन**

या पक्षप्रवेशातून शरदचंद्र पवार पक्षाने ठाणे ग्रामीणमध्ये संघटनात्मक ताकद दाखवून दिल्याचे चित्र आहे. एकीकडे सत्तेचा गवगवा आणि दुसरीकडे सत्ताधारी गटातील पदाधिकाऱ्यांची घरवापसी-या राजकीय विरोधाभासामुळे ठाणे ग्रामीणमध्ये राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांमधील संघर्षाला नवे वळण मिळाले आहे.

भरतभाऊ गोंधळे यांच्यासारख्या अनुभवी नेत्यासह शेकडो कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश हा केवळ पक्षबदल नसून



ठाणे ग्रामीणच्या राजकारणातील आगामी समीकरणांची दिशा बदलणारी सुरुवात ठरणार का? याकडे आता राजकीय निरीक्षकांचे लक्ष लागले आहे.

सत्ताधारी गटाला मोठा धक्का, बड्या पदाधिकाऱ्यांची घरवापसी आणि शेकडो कार्यकर्त्यांचा शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश-ठाणे ग्रामीणच्या राजकारणात या 'पॉवर एन्ट्री'ने आगामी निवडणुकांपूर्वीच राजकीय वातावरण नक्कीच तापले आहे.

---

# पत्रकार मावनूर यांचा प्रामाणिकपणा व माणुसकी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : माझे मित्र व दैनिक साक्षी-चे प्रतिनिधी श्री.श्रीनिवास मावनूर यांनी प्रामाणिकपणा दाखवून आपल्यातील म णुसकीचे दर्शन घडविले आहे.श्री. मावनूर यांचे जोड भावी पेठ,चाटला चौक येथे निर्मल हेअर कटिंगचे दुकान आहे. त्यांच्या दुकानासमोर रविवारी संध्याकाळी सातच्या सुमारासव अंबिका पुजारी पडला होता, त्या मोबाईलच्या कव्हरमागे पाचशेच्या चार नोटासुद्धा होत्या. तो मोबाईल श्री.म ावनूर यांना सापडला आणि तो मोबाईल संबंधित व्यक्तीला देण्यासाठी त्यांनी स्वतः च्या बॅगेत ठेवला.त्यानंतर संबंधित व्यक्तीने अनेकवेळा फोन केला पण मोबाईल सायलेंट



मोडवर असल्यामुळे श्रीनिवास यांना काही सम जले नाही,ते रात्री नऊ वाजता गेले व त्यांनी घरी सापडलेला मोबाईल पहिला तर त्यावर अनेक मिस कॉल दिसले आणि उलटा परत फोन करायचा म्हटले तर तो फोन लॉक होता,त्याचवेळी त्या फोनवर रिंग आली आणि लगेच फोन उचलून तो सापडल्याचे सांगितले.त्यांनी सोमवारी सकाळी आपल्या दुकानी संबंधित व्यक्तीला बोलवून त्यांचा मोबाईल फोन व दोन हजार रुपये दिले. त्यावेळी संबंधित व्यक्तीने डोळ्यात अश्रू आणत पत्रकार मावनूर यांना धन्यवाद दिले.ही बाब व रक्कम छोटी असली तरी संबंधित व्यक्तीला त्याचे मोल अधिक होते. श्री.मावनूर यांनी प्रामाणिकपणा व माणुसकी दाखविल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन.या मित्राचा मला रास्त अभिमान आहे.

दशरथ वडतिले, माजी अध्यक्ष, सोलापूर श्रमिक पत्रकार संघ

---

# दुधनी व परिसरातील अवैध धंद्यांसह दंडेलशाही व चोरांचा बंदोबस्त करावा : सैदप्पा झळकी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी प्रतिनिधी/निंगप्पा निंबाळ : दुधनी शहर व परिसरातील अवैध धंद्यांना आळा घालण्याबरोबरच चोरीच्या व दंडेलशाहीच्या घटनांवरही पोलिस प्रशासनाने कठोर कारवाई करावी, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)चे जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांनी केली आहे.

झळकी हे आमच्या



प्रतिनिधींशी बोलतांना म्हणाले की, दुधनी व परिसरात सध्या जोमात सुरू असलेल्या अवैध धंद्यांमुळे सामाजिक वाता-वरणावर विपरीत परिणाम होत असून, या धंद्यांवर पोलिस प्रशासनाने सातत्याने लक्ष ठेवून कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर परिसरात दंडेलशाही व चोरीच्या घटनांम ध्ये भरमसाठ वाढ झाली असून हे होऊ नये या साठी रात्रीची पोलिस गस्त वाढविणे, संशयित व्यक्तींवर लक्ष ठेवणे आणि नागरिकांच्या तक्रारींची विलंब न करता तातडीने वेळेवर दखल घेणे आवश्यक असल्याचे ही रिपाइंचे श्री सैदप्पा झळकी यांनी सांगितले.

अवैध धंदे सह दंडेलशाही आणि चोरीच्या घटनांना आळा बसल्यास नागरिकांम ध्ये पोलिसाबद्धलची भावना बदल होईल. त्यामुळे दुधनी व परिसरातील अवैध धंद्यांसह दंडेलशाही व चोरांचाही बंदोबस्त करण्यात यावा, अशी मागणी सैदप्पा झळकी यांनी केली.

---

# ईद-ए-मिलादुन्नबीपूर्वी वीजपुरवठा सुरळीत आणि जुलूस मार्गावरील खड्डे बुजवा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : दि. २६ ऑगस्ट रोजी ईद-ए-मिलादुन्नबी अर्थात पैगंबर जयंतीनिमित्त अक्कलकोट शहरात मोठ्या उत्साहात विविध धार्मिक कार्यक्रम, जुलूस, मिरवणूक तसेच सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.




**अक्कलकोट मुस्लिम युवक संघटनेचे महावितरण व नगरपालिका प्रशासनाला निवेदन**

या पार्श्वभूमीवर जुलूस मिरवणूक मार्गावरील खड्डे तातडीने बुजवून रस्ते सुरक्षित करावेत तसेच शहरातील वीजपुरवठा अखंडित व सुरळीत ठेवावा, अशी मागणी अक्कलकोट मुस्लिम युवक संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

यावेळी शुकूर शेख, दाता बळोरगी, सोहेल फरास, इरफान दावना, रशीद खिस्तके, सैपन शेख, सैपन हगलदिवटे, मुबारक कोरबु, रजाक शेख,अकिब बागवान, बाबा पठाण, कायुम बेपरी, इम्रान हगलदिवटे, समीर शेख, अकिल मुजावर, पालडे आदी उपस्थित होते अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते सोहेल फरास यांनी दिली आहे.

---

# शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी गणेश लंबे, उपाध्यक्षपदी प्रविण सरकटे यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे/बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंदखेडराजा तालुक्यातील सायाळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची निवड मुख्याध्यापक भालेराव सर यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

यावेळी सर्वानुमते शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी गणेश लंबे तर उपाध्यक्षपदी प्रविण सरकटे यांची निवड करण्यात आली.सायाळा मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हि पहिली ते चौथी पर्यंत आहे . तसेच अध्यक्ष गणेश लंबे. प्रविण सरकटे उपाध्यक्ष.सदस्य आत्माराम लंबे.विजय जाधव. विनोद सरकटे जगदिश लंबे. प्रविण आव्हाळे.शिवाजी इंगळे. दिपक सरकटे.दिलवाले सर शिक्षक




प्रतिनिधी. इंगळे सर भालेराव सर सचिव यांच्या अध्यक्षतेखाली निवड करण्यात आली. यावेळी उपस्थित होते.यांच्या निवडीबद्दल परिसरात यांनी अभिनंदनाचा वर्षाव केला

---

**स्वेरीचा २८ वा वर्धापनदिन थाटात संपन्न**

**कलाशिक्षक व साहित्यिक प्रा. प्रकाश राऊत यांचे प्रतिपादन**

# स्वेरीतून मिळणाऱ्या संस्कारांमुळे विद्यार्थी घडत आहेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'स्वतःच्या आयुष्याचे रणांगण करून घेणारे डॉ.रोंगे सर यांनी विद्यार्थ्यांचे करिअर उज्वल करण्याचा वसा घेतला आहे. त्यामुळे, त्यांच्या कार्याला आपण फक्त साथ द्यायची भूमिका घ्यायची आहे. आपले बलस्थान ओळखून आपल्याला बाहेरचे विश्व आत्ताच खुणावत आहे. विद्यार्थ्यांना डॉ. रोंगे सरांप्रमाणे सातत्याने परिश्रम करावे लागणार आहेत. त्यामुळे सहनशीलता व नेतृत्व करण्याचे गुण अंगी येतील. स्वेरीतून मिळणाऱ्या संस्कारांमुळे विद्यार्थी अतिशय चांगल्या पद्धतीने घडत आहेत. आता या शिक्षणतज्ज्ञांना शिक्षण क्षेत्रातील प्रश्न सोडविण्यासाठी विधानपरिषदेमध्ये पाठविण्याची गरज आहे, तसा सर्वत्र अभूतपूर्व प्रतिसाद देखील मिळत आहे.' असे प्रतिपादन चिपरी (जि.कोल्हापूर) मधील जीवा पाटील हायस्कूलचे कलाशिक्षक व साहित्यिक प्रा. प्रकाश राऊत यांनी केले.




स्वेरीच्या २८ व्या वर्धापन दिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून साहित्यिक प्रा. प्रकाश राऊत हे मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वेरीचे अध्यक्ष अशोक भोसले हे होते. स्वेरीचे मार्गदर्शक कर्मयोगी श्रद्धेय कै. सुधाकरपंत परिचारक यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून सर्व उपस्थित पाहुण्यांनी आदरांजली वाहिली. दीपप्रज्वलनानंतर स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांनी सर्वांचे स्वागत करून प्रास्ताविकामध्ये '१९९८ पासून ते आत्तापर्यंतच्या २८ वर्षांच्या स्वेरीच्या यशस्वी वाटचालीतील म हत्त्वाचे टप्पे, पावलोपावली झालेल्या संघर्षातून गोपाळपूरच्या माळरानावर हा इतिहास घडला, हे सांगून जीवनात जर यश मिळवायचे असेल तर कसल्याही परिस्थितीचा बाऊ करू नये हा मेसेज दिला. यासाठी कधी कधी कम्फर्ट झोनच्या बाहेर जाऊन कार्य केल्यास इतिहास घडतो. त्याचबरोबर कालानुरूप होणारे बदल हे स्वीकारून यशाकडे वाटचाल सुरू ठेवली पाहिजे. 'टफ टाईम्स नेव्हर लास्ट बट टफ पीपल डू' या पुस्तकाने माझ्या जीवनाला कलाटणी दिली आणि तेंव्हापासून मी नियमित वाचन करू लागलो. वाचनामुळे मन प्रसन्न राहते आणि मानसिक दृष्ट्या खंबीर राहिल्यास निर्णय अचूक ठरतात असे सांगून अभियांत्रिकीच्या प्रवेशाबाबत बोलताना ते म्हणाले की 'अभियांत्रिकीची प्रत्येक ब्रांच चांगली आहे, फक्त त्याला आपण योग्य न्याय दिला पाहिजे, असे सांगून त्यांनी अभियांत्रिकीच्या प्रवेशाबाबत मार्गदर्शन केले. करमाळ्याच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे सर्वेसर्वा प्रा. विलास घुमरे म्हणाले की, डॉ.रोंगे सर म्हणजे सहनशीलता, अभ्यासू निरीक्षण, परीक्षण करणारे अष्टपैलू नेतृत्व असून यांचे नाव राज्यात तर आहेच पण आता त्यांची विधानसभेत शिक्षक आमदार म्हणून नवी ओळख व्हावी, अशी इच्छा आहे. सरांच्या अभ्यासाचा फायदा राज्यातील शिक्षकांना व्हावा अशी अपेक्षा व्यक्त करून शासन

**विद्यार्थ्यांच्या करिअरच्या हिताचा विचार करता स्वेरी कॅम्पसची भाषा इंग्रजी आहे. करिअरच्या दृष्टीने इंग्रजी संभाषण केले तर जागतिक बाजारपेठेमध्ये यासाठी विद्यार्थ्यांचे महत्त्व वाढते म्हणून कॅम्पस मधील संभाषणाची भाषा इंग्रजी आहे. त्यामुळे कॅम्पस मध्ये सर्वजण इंग्रजी मध्ये संभाषण करतात हे सर्वश्रुत आहे. असे असताना वर्धापन दिनी आलेले पाहुणे, पालक त्यांना व्यवस्थित समजण्यासाठी मराठी भाषेची गरज आहे हे ओळखून प्राचार्य डॉ. रोंगे सरांनी मराठीत बोलण्याची परवानगी विद्यार्थ्यांकडून घेतल्याचे पाहून आलेले पाहुणे व पालक थक्क झाले.**

दरबारी शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी डॉ. रोंगे सरांना निवडून देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन केले. वटवटे येथील जकराया शुगर फॅक्टरीचे चेअरमन ऍड. बिरप्पा जाधव म्हणाले की, 'मी शेतकऱ्यांसाठी वकिली केली असून त्यांच्या वेदना जवळून पाहिलेल्या आहेत. त्यासाठी मी काम पाहत आहे तसेच अभियांत्रिकीचे सर्व साईड सर्वोत्तम आहेत. एक ब्रांच मिळाली नाही तर नाराज न होता दुसरी बॅच घ्या, त्यात करिअर करा. स्वेरीच्या प्लेसमेंटचा डंका राज्यात घुमतोय. माझ्या एल.एल.बी. चा उपयोग प्रशासकीय कामामध्ये होत असताना आता कोणतीही अडचण येत नाही, त्यामुळे मुळाशी जावे लागते. सतत पॉझिटिव्ह विचार ठेवल्यास यशस्वी होता येते.' स्वेरीच्या वाटचालीचे साक्षीदार असलेले सेवानिवृत्त पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.विश्वासराव मोरे यांनी देखील मनोगतात डॉ.रोंगे सरांच्या व सहकाऱ्यांच्या परिश्रमाचे बहारदार शैलीत कौतुक केले. वर्धापन दिन कार्यक्रमानंतर घेतलेल्या 'सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्यातील सुप्त कलागुण, मिमिक्री तसेच जुन्या हिंदी गीतांचा सुरेख संगम ऐकविला. एकसूत्रपणाने केलेले नृत्य आणि लक्षवेधी प्रकाश योजना यामुळे सर्व उपस्थित थक्क झाले. वर्धापन दिनामध्ये स्वेरी परिवारातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या गुणवंत पाल्यांचा देखील सन्मान करण्यात आला. स्वेरीच्या वर्धापन दिनानिमित्त मुख्य इमारत व नूतन इमारतीची विविध रंगांच्या लाईट माळांच्या रोषणाईने आकर्षकता वाढवली होती. यावेळी प्राचार्य डॉ.फंड, करकंबचे आदर्श शिक्षक पत्रकार भीमराव व्यवहारे, विठ्ठलराव शिंदे प्रशालेचे संभाजी थिटे, गोपाळपूरचे सरपंच पांडुरंग देवमारे, माजी उपसरपंच विक्रम आसबे, पंढरपूरचे माजी उपनगराध्यक्ष सुभाष भोसले, विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या व्हाईस चेअरमन व स्वेरीच्या विश्वस्त सौ. प्रेमलता रोंगे, उपाध्यक्ष एस.टी.राऊत, श्रीमती वंदना रोंगे, विश्वस्त एच. एम. बागल, विश्वस्त बी.डी. रोंगे, स्वेरीचे सचिव डॉ. सुरज रोंगे, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम. पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ.एम.जी. मणियार, डी. फार्मसीचे प्राचार्य डॉ.सतीश मांडवे, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.एन.डी. मिसाळ, डिग्री इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व पाचही महाविद्यालयांतील विद्यार्थी उपस्थित होते. इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ.नीता तळवलकर, सोनाली कांबळे व ज्ञानेश्वरी मेटकरी यांनी सूत्रसंचालन केले तर सर्वांच्या मिष्टांन्न भोजनाने कार्यक्रमाची सांगता केली.